# BOARD KRUTIPATRIKA : JULY 2017
# MARATHI VACHANPATH

**Time: 3 Hours** **Total Marks: 80**

**कृतिपत्रिकेसाठी सूचना : –**

१. सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यामधील आकृत्या काढाव्यात.
२. आकृत्या पेनानेच काढाव्यात.
३. उपयोजित लेखनातील प्रश्नांसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच हे प्रश्न लिहून घेऊ नयेत.
४. स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

## विभाग १ – गद्य

**कृ.१.(अ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

१. i. का ते लिहा. **(१)**

मास्तरांना काव्यवाचनासाठी कॉलेजांमधून बोलावलं जायचं कारण __________

ii. कोण ते लिहा. **(१)**

मास्तरांच्या कवितांची पहिली श्रोता – [ ]

चिंचपोकळीला आल्यानंतर मास्तरांचा दुसरा काव्यसंग्रह 'माझे विद्यापीठ' प्रसिद्ध झाला. हा काव्यसंग्रह नंतर अनेक विद्यापीठांतून अभ्यासक्रमालाही लावला होता. त्यासाठी अनेक कॉलेजांमधून मास्तरांना मुलाखतीसाठी, काव्यवाचनासाठी बोलावलं जायचं. मला गंमत वाटायची आणि कौतुकही. कारण मास्तर स्वत: कधीच कॉलेजची पायरी चढले नव्हते, पण त्यांची कविता तेरावी, चौदावीची मुलं अभ्यासत होती. अनेकांची पत्रंही यायची मास्तरांना. मास्तर खूप आनंदात असायचे. एखादी नवी कविता लिहून झाली की मग विचारायलाच नको. त्यांच्या अनेक कवितांची पहिली श्रोता मीच असायची. कविता लिहून झाली की ते मला वाचून दाखवायचे. त्यांनी कविता लिहिल्याचा मलाही आनंद होत असे, पण तो व्यक्त कसा करायचा हे मला समजत नसे किंवा कविता ऐकल्यावर प्रतिक्रिया काय द्यायची हेही समजत नसे.

लेखिका – कृष्णाबाई सुर्वे

२. i. एका वाक्यात उत्तर लिहा :

मास्तरांना खूप आनंद केव्हा होत असे? **(१)**

ii. **कंसातील योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा :**

अ. 'मास्तर आणि मी' या पाठातील 'मी' चे 'मास्तरांशी' असलेले नाते __________ आहे. **(१/२)**
(विद्यार्थिनीचे / सहशिक्षकाचे / पत्नीचे / श्रोत्याचे)

ब. 'माझे विद्यापीठ' प्रसिद्ध झाला तेव्हा मास्तर __________ या गावी राहात होते. **(१/२)**
(चिंचवड / चिंचपोकळी / चंद्रपूर / नेरळ)

३. **व्याकरण :**

i. खालील शब्दांसाठी उताऱ्यात आलेले विरुद्धार्थी शब्द लिहा : **(१)**

अ. [जुनी × ]

ब. [दु:ख × ]

ii. लिंग ओळखा : (१)

| | |
|---|---|
| काव्यसंग्रह = | कविता = |

४. **माझे मत :** (२)

'कविता ऐकल्यावर प्रतिक्रिया काय द्यायची हेही समजत नसे' कृष्णाबाईंच्या या उद्‌गारामागील तुम्हाला जाणवलेली कारणे तुमच्या शब्दांत लिहा.

**(ब) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा :** (१)

१. i. योग्य जोड्या जुळवा :

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| i. समाजाने झिडकारलेले | अ. बाबा आणि आई |
| ii. स्वप्नांचे महाल बांधणारे | ब. बाबा |
| | क. महारोगी |

ii. रिकामी जागा भरा : (१)

भारत स्वतंत्र झाल्यावर __________ वर्षांनी आनंदवनी दवाखाना सुरू झाला.

कुष्ठरोगावर उपाय करण्याचे काम ठरविल्यावर बाबा या रोगाचा अभ्यास करण्यासाठी कलकत्त्याला गेले. कुष्ठरोग कोणत्याही प्राण्याला होत नाही त्यामुळे यावर संशोधन करणे मोठेच कठीण काम. बाबांनी या प्रयोगांसाठी स्वत:चे शरीर देऊ केले. कुष्ठरोगाचे जंतू स्वत:च्या शरीरात टोचून घेण्यासाठी ते तयार झाले.

पुढे १५ ऑगस्ट, १९४९ ला बाबांचा दवाखाना आनंदवनी झाडाखाली सुरू झाला. बाबा शिकले होते वकिली, झाले डॉक्टर !

बरोबर चार-पाच महारोगी, ज्यांना समाजाने झिडकारलेलं, ज्यांची हातापायांची बोटं झडून गेलेली. पण मनं ? जगायची उभारी असलेली. अशांबरोबर तट्ट्याच्या झोपडीत बाबा आणि ताईंनी स्वप्नांचे महाल बांधले 'सुखी, समृद्ध' जीवनाची सुरुवात केली.

आठ-दहा फूट लांबीच्या आकाराची झोपडी आणि मैलोनमैल पसरलेले अंगण असं त्यांचं वसतिस्थान होतं. अंगणात, या घरात एके दिवशी 'सूर्यानं' आपल्या किरणांनी प्रवेश केला.

हे वसतिस्थान म्हणजे 'आनंदवन' ! आनंदवनात 'विकासा'ची पावलं उमटू लागली.

२. खालील विधाने सत्य वा असत्य ते ओळखून लिहा : (२)

i. महारोगी लोकांबरोबर बाबा आनंदवनात रमले =

ii. बाबा वकील होते =

iii. समाजाने बाबांना झिडकारले =

iv. बाबांनी त्वचारोगांचा अभ्यास केला =

३. **व्याकरण :**

i. खालील शब्दांसाठी उताऱ्यात आलेली विशेषणे शोधून लिहा: (१)

१. __________ – कामे

२. __________ – जीवन

ii. खालील वाक्यांचा प्रकार ओळखा : (१)

१. वसतिस्थानाला बाबांनी नाव दिले 'आनंदवन' !

२. बाबांनी या प्रयोगांसाठी स्वत:चे शरीर देऊ केले.

४. **माझे मत :** (२)

'समाजसेवक' होण्यासाठी आवश्यक असलेल्या व्यक्तिमत्त्वाच्या वैशिष्ट्यांबाबत तुमचे मत लिहा.

**(क) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा :** **(२)**

१. तुलना करा :

| वेळेचे महत्त्व जाणणारी माणसे | वेळेचे महत्त्व न जाणणारी माणसे |
|---|---|
| i.<br>ii.<br>iii.<br>iv. | |

वेळ ही फार मौल्यवान गोष्ट आहे. म्हणूनच वेळेचा सदुपयोग समजुतदारपणे केला पाहिजे. वेळेचा वेग किती हे कोणालाच सांगता येणार नाही. पण जो वेळेचे भान जाणून कामाचे नियोजन करतो त्याला दैनंदिन कामाव्यतिरिक्त इतर अनेक गोष्टींसाठी भरपूर वेळ देता येतो. वेळेचे महत्त्व जाणणारी माणसे आपल्या छंदाची मनापासून पूर्तता करू शकतात. दिवसभर कामाच्या व्यापातून घरी आलेली व्यक्ती दीड-दोन तास ग्रंथालयात घालवू शकते. वेळ नाही ही सबब केवळ आळशी माणसेच देतात. त्यांच्याजवळ कामाचे नियोजनही नसते. त्यामुळे कामही वेळेवर होत नाही आणि याचा परिणाम म्हणजे अशी माणसे अपयशाचे धनी होतात.

२. 'वेळ ही फार मौल्यवान गोष्ट आहे', हे विधान सोदाहरण स्पष्ट करा. **(२)**

## विभाग २ – पद्य

**कृ.२.(अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा:**


१. प्रत्येकी **एका** शब्दात उत्तरे लिहा : **(२)**

i. संत नरहरी सोनार निरंतर कशाचा जप करतात ? _______

ii. 'मोठेपण' या अर्थाचा अभंगात आलेला शब्द कोणता ? _______

कृपा करी पंढरीनाथा । दीनानाथा तूं समर्था ।।१।।
अपराध करी क्षमा । तुझा न कळे महिमा ।।२।।
करी भक्ताचा सांभाळु । अनाथांचा तूं कृपाळू ।।३।।
आम्ही बहुत अन्यायी । क्षमा करी विठाबाई ।।४।।
दयासागरा अनंता । कृपा करी पंढरीनाथा ।।५।।
तुझें नामामृत सार । नरहरी जपे निरंतर ।।६।।

२. आकृतिबंध पूर्ण करा : **(२)**




३. i. कोष्टक पूर्ण करा : **(१)**

| संत कवी | संप्रदाय | प्रसिद्ध साहित्यप्रकार |
|---|---|---|
| **संत नरहरी सोनार** | | |

ii. रिकामी जागा भरा : (१)

संत नरहरी सोनार ________ व्या शतकातील प्रसिद्ध संत होते.

४. ‘कृपा करी पंढरीनाथा’ या अभंगातून व्यक्त झालेली भावना सविस्तरपणे स्वभाषेत लिहा. (२)

**(ब) खालील पद्याच्या वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा :**

१. खालील घटना व परिणाम यांचा योग्य सहसंबंध लिहा : (२)

| घटना | परिणाम |
|---|---|
| i. गावाची आठवण येणे | i. गावापासून दूर रहावे लागणे |
| ii. नोकरी, व्यवसायाचे निमित्त ठरणे | ii. वाणी अबोल होणे |
| iii. शेतातील पिके डोळ्यांसमोर येणे | iii. गावी परतावेसे वाटणे |
| iv. गावची नदी आठवणे | iv. बेचैनी दूर होणे |

डोळ्यापुढती येतो जेव्हा आठवणीचा गाव
विरूनी जाती वाऱ्यावरती बेचैनीचे भाव
वळण वाकड्या नदीत आहे खळखळते पाणी
नजर पाखरू भिरभिरे पण अबोल होई वाणी
बाभळीच्या बनाशेजारी आंब्याची आमराई
गर्द सावली पहुडलेली वारा गातो अंगाई
हिरवेगार पीक नाचते काळ्याभोर शिवारी
रेंगाळते मन त्या ठिकाणी पाय नेती माघारी
गावापासून केले दूर वीतभरच्या पोटाने
तरी ओळख होतसे अमुची गावाच्या नावाने

२. i. प्रश्न तयार करा : (१)

‘तरी ओळख होतसे अमुची गावाच्या नावाने’, या काव्यपंक्तीत उत्तर असेल असा प्रश्न तयार करा.

ii. खालील अर्थाचा कवितेतील योग्य शब्द लिहा : (१)

१. खूप कमी बोलणारा = [ ]

२. आंब्याची झाडे असलेली जागा = [ ]

३. योग्य पर्याय निवडा : (२)

i. ‘गाव’ ही कविता ________ या कवितासंग्रहातून घेतली आहे.
(‘गाफील’/ ‘यातिक’/ ‘मातेरं’/ ‘चैत्रबन’)

ii. ‘बिजानं धरला कोंब’ या कवितासंग्रहास ________ पुरस्कार मिळाला आहे.
(साहित्य रत्न / साहित्य अकादमी / ग. ल. ठोकळ / ग. दि. मा. स्मृती )

४. गावाच्या आठवणींनी हळव्या झालेल्या कवीचे भावविश्व तुमच्या शब्दांत स्पष्ट करा. (२)

## विभाग ३ – स्थूलवाचन

**कृ.३. अ. कोणत्याही दोन कृती सोडवा :** (४)

१. खालील मुद्द्यांना धरून अम्मांनी रेवन्त व अनाहिता यांना दिलेली मौलिक शिकवण लिहा :

[ पाणी ] [ वृक्ष ]

२. पश्चिम महाराष्ट्राच्या एकाच पट्ट्यात असणाऱ्या खालील गावांमधील 'वेगळेपण' सविस्तर लिहा :

| | | | |
|---|---|---|---|
| सागाव | सिद्धनेली | कापशी | कागल |

३. प्रतिसरकारच्या स्थापनेच्या रोमहर्षक पर्वाचे खालील मुद्द्यांना अनुसरून वर्णन करा :

| | | | |
|---|---|---|---|
| भूमिका | नेतृत्व | स्थापना | नियंत्रणाखालील प्रदेश |

## विभाग ४ – व्याकरण

**कृ.४.(अ) समास :**

१. 'अ' व 'ब' गटातील एक जोडी बरोबर आहे. बरोबर जोडी पर्यायी उत्तरातून शोधून लिहा : **(१)**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| i. चारपाच | द्वि समास |
| ii. पालापाचोळा | इतरेतर द्वंद्व समास |
| iii. बरेवाईट | वैकल्पिक द्वंद्व समास |

बरोबर उत्तर :

'अ' ☐ 'ब' ☐

२. अधोरेखित सामासिक शब्दातील समासाचे नाव चौकटीत लिहा : **(१)**

i. स्त्रिया चातुर्मासात व्रते करतात.

☐ समास

ii. सभेस स्त्रीपुरुष हजर होते.

☐ समास

**(ब) वाक्य परिवर्तन :**

१. आम्ही तुमचे उपकार कसे विसरू ? (विधानार्थी करा.) **(१)**

२. ही इमारत खूप उंच आहे. (उद्गारार्थी वाक्य करा.) **(१)**

**(क) शब्दसंपत्ती :**

१. अनेक शब्दांबद्दल एक शब्द द्या: **(१)**

कविता करणारी – ☐

अभिनय करणारा – ☐

२. खालील शब्दांच्या उच्चारांत खूप साम्य आहे; परंतु लेखन व अर्थ यांमध्ये फरक आहे. खालील शब्दांचे अर्थ लिहा : **(१)**

i. दिन ↔ ☐ दीन ↔ ☐

**(ड) विरामचिन्हे :**

खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा उपयोग करून वाक्य पुन्हा लिहा : **(१)**

'हा कोण लागून गेला टिक्कोजीराव आपल्या घरात येऊन झोपणारा '

**(इ) लेखननियमांनुसार लेखन :**

अचूक शब्द ओळखा : **(१)**

i. आशिर्वाद, आशीरवाद, आशीर्वाद, आर्शीवाद – [ ]

ii. परिक्षा, परीक्षा, परीक्क्षा, परिक्क्षा – [ ]

**(फ) वाक्प्रचार :**

१. खालील वाक्यातील वाक्प्रचार ओळखा व त्याचा अर्थ लिहा : **(१)**

मे महिन्याच्या सुट्टीत मुलांनी सहलीला जाण्याचा बेत आखला.

वाक्प्रचार – [ ]  अर्थ – [ ]

२. खालील वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा : **(१)**

हैराण करणे – [ ]

## विभाग ५ – उपयोजित लेखन

**कृ.५.(अ)**

**१.** पत्रलेखन : **(५)**

**उत्कर्ष बुक डेपो**

यशवंतनगर, मिरज

विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलत

दर्जेदार पुस्तके मिळण्याचे एकमेव ठिकाण

↓

ग्रंथालय प्रतिनिधी या नात्याने

मागणी केलेल्या प्रतींपेक्षा कमी प्रती व एक पुस्तक उपलब्ध करून न दिल्याबद्दल तक्रार करणारे पत्र लिहा.

**किंवा**

खालील पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.

१. ‘धुळपाटी’ शांता शेळके, ५ प्रती
२. ‘स्वामी’ रणजित देसाई, ५ प्रती
३. ‘सय’ सई परांजपे, २ प्रती
४. ‘व्यक्ती आणि वल्ली’, पु. ल. देशपांडे, ५ प्रती

**२.** कथालेखन : **(५)**

खालील शीर्षक वाचा व शीर्षकासाठी योग्य कथा लिहा :

शीर्षक

खरी मैत्री

**३.** गद्य आकलन : **(५)**

खालील उतारा वाचून त्यावर **पाच** प्रश्न असे तयार करा, की ज्यांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात येतील.

शिरोडे गाव तसे अगदीच छोटेखानी. रत्नागिरी जिल्ह्याचे दक्षिण टोक. समुद्राचे सान्निध्य लाभलेले. जेमतेम दोन हजारांची वस्ती. गावात इंग्रजी शाळा होती. तिचे नाव 'ट्युटोरियल इंग्लिश स्कूल'. याच शाळेत मुख्याध्यापक होण्यासाठी भाऊसाहेब खांडेकर निघाले होते. सारे गाव मास्तरांच्या येण्याकडे डोळे लावून बसले होते. अखेर दुपारच्या चटके देणाऱ्या उन्हात घामाच्या धारा वाहवीत मास्तर शिरोड्याच्या लोकांना दिसले. 'मास्तर इलो, मास्तर इलो' अशी वार्ता मुखामुखातून गावात पसरली. हे मास्तर म्हणजेच ज्ञानपीठ पुरस्कार मिळविणारे महाराष्ट्रातील मान्यवर लेखक-विष्णू सखाराम खांडेकर ! शेकडो कथा, अनेक कादंबऱ्या, बहुसंख्य लघुनिबंध, अनेक पटकथा इत्यादी साहित्यप्रकारांनी मराठी सारस्वताला समृद्ध करणारा लोकप्रिय साहित्यिक !

**(ब) खालील लेखनप्रकारांपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा (३ पैकी २):** **[१०]**

**१.** संवादलेखन :

आदर्श विद्यालय, सारोळे

इ. ९ वी व इ. १० वी मधील विद्यार्थ्यांसाठी सूचना –

कार्यानुभव विषयांतर्गत

कात्रज डेअरी, पुणे येथे क्षेत्रभेट

दि. २६ डिसेंबर

दि. २० डिसेंबर पूर्वी कार्यानुभव विषयाच्या शिक्षकांकडे नावे द्यावीत.

शालेय फलकावर लिहिलेली वरील सूचना वाचून तुम्ही व तुमची आई यांच्यात घडलेला संवाद **साठ** ते **ऐंशी** शब्दांत लिहा.

**२.** जाहिरात लेखन :

खालील सूचनेनुसार कृती करा :

संगणकवर्गाची आकर्षक जाहिरात तयार करा.

**३.** सारांश लेखन :


खालील उताऱ्याचा एक तृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

उत्तुंग इमारती, टुमदार बंगले, निरनिराळ्या प्रकारचे फर्निचर, टी. व्ही., टेलिफोन, मोटारी, वगैरे ज्या विविध सुधारणा माणसाने केल्या, त्यामुळे माणसाच्या देहाच्या उत्तम सोयी झाल्या; परंतु यामुळेच मानवसमाज चैनीकडे, आरामाकडे सरकू लागून संस्कृतीपासून दूर जाऊ लागला. परिणामी उन्नतीच्या मार्गाला लागण्याऐवजी माणूस माणसापासून दूर झाला. वास्तविक जी कृती किंवा संस्कार समाजाला समता, सभ्यता, सामंजस्य, सहिष्णुता, समाधान यांजकडे नेतात, त्याला खऱ्या अर्थाने संस्कृती म्हणतात. ही पाच तत्त्वे म्हणजे मानवी संस्कृतीचे पंचशील होय; परंतु ज्यांना आपण भौतिक सुधारणा असे म्हणतो, त्या सुधारणांमुळे जगात विषमतेची दरी रुंदावत आहे. याचा अर्थ असा नाही की सुधारणा नकोत. सुधारणा अवश्य पाहिजेत; पण त्या संस्कृतीचा बळी देऊन नकोत.


(क) **खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा (३ पैकी १) (शब्दमर्यादा ८० ते १००):** (५)

१. **मी पाहिलेली सर्कस :**

खालील मुद्द्यांच्या आधारे लेखन करा :




२. **आई संपावर गेली तर ............**




वरील मुद्दे लक्षात घेऊन लेखन करा.

३. **आत्मकथन:**

खालील घटकाचे आत्मकथन लिहा:

